# प्रकरण दुसरे

## 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील आशयाचे स्वरूप

# प्रकरण दुसरे : रूपरेषा

## 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील आशयाचे स्वरूप


२.१ प्रस्तावना

२.२ अच्युत आठवले आणि आठवण

२.२.१. जागतिकीकरणाचा चक्रव्यूह

२.२.२. राजकीय भाष्य

२.२.३. प्रसारमाध्यमांचे अवास्तव स्तोम

२.२.४. उच्च मध्यमवर्गीयांच्या आयुष्याच्या निरर्थकत्वाची कहाणी

२.२.५. नैतिकता

२.२.६. साहित्यिक भाष्य

२.२.७. ज्ञान-विज्ञानातील फोलपणा

२.२.८. जातीयता

२.२.८. नवा कालविचार

२.३. समारोप

# प्रकरण दुसरे

# 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील आशयाचे स्वरूप

## २.१ प्रस्तावना

१९६० नंतरची एकूणच मराठी नवकादंबरी व त्यामध्ये मकरंद साठे यांचे असलेले योगदान तपासल्यानंतर या प्रकरणामध्ये त्यांच्या कादंबरीतील आशयाचे स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

भालचंद्र नेमाडे, मनोहर शहाणे , श्याम मनोहर, विजय तेंडुलकर, अशा काही लेखकांनी मराठी कादंबरी वेगळ्या दिशेनं नेण्याचा प्रयत्न केला. त्यात आता मकरंद साठे यांचाही मोठा वाटा आहे. त्यांच्या 'अच्युत आठवले आणि आठवण' या पहिल्या कादंबरीत त्यांनी वास्तवाची एक वेगळीच मांडणी केली. 'ऑपरेशन यमू' मध्ये त्यांनी 'अच्युत आठवले आणि आठवण' पेक्षा वेगळी वाटचाल केली आहे. या दोन्ही कादंबऱ्या त्यांचा कादंबरीकार म्हणून उल्लेख करण्यास पुरेशा आहेत.

मराठीतील कादंबरी या साहित्यप्रकाराची संकल्पना सर्वप्रथम मोडीत काढली भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीने. पण 'कोसला' नंतर पुन्हा एकदा मराठी कादंबरी कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, भाषाशैली या त्याच त्या तात्त्विक अंगाने निर्माण होत राहिली. 'कोसला'च्या नव्या वाटेची पायवाट करण्याचे धाडस इतर कादंबरीकारांनी फारसे केलेले नाही. वास्तववादाच्या पुढे खूप जायचा प्रयत्न करणाऱ्या आणि मोडतोड करत कादंबरी या वाङ्.मयप्रकाराला पुढे नेणाऱ्या काही मोजक्या कादंबरीकारांमध्ये मकरंद साठे यांच्या कांदबऱ्यांचा उल्लेख आवर्जुन करावा लागतो.

## २.२ अच्युत आठवले आणि आठवण

ही मकरंद साठे यांची पहिली कादंबरी २००३ मध्ये प्रकाशित झाली. साठे यांची ही पहिलीच कादंबरी असली तरी त्यामध्ये नवखेपणाच्या खुणा नाहीत. 'अच्युत आठवले आणि आठवण' ही एक व्यामिश्र कादंबरी आहे. त्यात एका व्यक्तीच्या आठवण्याविषयी वा विसरण्याविषयी लेखक बोलत नाही, तो आजच्या आपल्या सगळ्या समाजाविषयीच बोलतो आहे, विशेषत: साठ–सत्तरच्या दशकातल्या पिढीविषयी. संपूर्णपणे पराभूत, स्मृतिभ्रंश झालेल्या, पण मधून–मधून स्मृतीचे झटके येणाऱ्या पिढीविषयी. साठ नंतरची ही पिढी वाढत असताना जग बदलत जात होते. परंतु ऐंशी–नव्वदच्या दशकात बदलाचा रेटा इतका झपाट्याने वाढत गेला की त्यामुळे बौद्धिक मानसिक अराजक तयार झाले.

बुद्धिजीवींना द्विधा अवस्थेमुळे कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोचणे अशक्य झाले. अच्युत आठवले हा या कादंबरीचा नायक अशा बुद्धिजीवी वर्गामधील आहे. भोवतालच्या जगामध्ये वावरताना तो एकाकी पडत जातो. हिंसेची बीजे कधी आपल्या मनात पडली ते अच्युत आठवलेला आठवत नाही'[१] हे वसंत आबाजी डहाके यांचे मत कादंबरीचे यथार्थ मूल्यमापन करते.

एका वाक्यात 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीचे कथासूत्र सांगायचे झाले तर अच्युत आठवले हा विद्वान वृद्ध गृहस्थ दुसऱ्या एका वृद्ध गृहस्थाचा खून करतो एवढेच सांगता येईल. परंतु अधिक बारकाईने पाहिले तर हे या कादंबरीचे कथासूत्र नाही हे ध्यानात येते. या कादंबरीतील ते घटीत आहे आणि ते अतिशय महत्त्वाचे आहे. त्या घटितावर ह्या कादंबरीची संरचना उभी आहे. निवेदक हा या कादंबरीतील महत्त्वाचा घटक आहे. तो कुणाची तरी गोष्ट आपल्याला सांगतो आहे, आणि त्या गोष्टीतून काही आशयसुत्रे सापडतात. त्या आशयसुत्रांच्या आधारे कादंबरीतील आशयाचे स्वरूप समजावून घेणे उचित ठरेल.

### २.२.१. जागतिकीकरणाचा चक्रव्यूह

आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते कौटुंबिक पातळीपर्यंत जागतिकीकरण, आधुनिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांनी जो काही धुमाकूळ चालवला आहे त्याचे यथार्थ चित्रण 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीमध्ये येते. ही कादंबरी नागर समाजाची, उच्च मध्यमवर्गीयांची, त्यांच्या आयुष्याच्या निरर्थकत्त्वाची कहाणी तर आहेच पण त्याचबरोबर ती अच्युत आठवले या नामवंत अर्थशास्त्रज्ञांची, जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहात अडकून त्याच्या झालेल्या वाताहतीची कहाणी आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने जनसामान्यांचे स्थैर्य धोक्यात आणलेच आहे; पण त्यातून अच्युत आठवलेसारखी विचारवंत मंडळीही सुटू शकत नाही, हा विचार ही कादंबरी मांडते.

जागतिकीकरणाच्या या चक्रव्यूहामध्ये अच्युत सारखी विचारवंत मंडळी तर अडकली आहेत परंतु त्याचबरोबर कादंबरीत येणारी गाडगीळ, प्रकाश कुलकर्णी, कोमलिनी कुलकर्णी, संवादिनी, वैजयंती, जोशी, साने, भगत, सोनसळे, पवार, बोधनी, चव्हाण वकील, शमा मुळे इ. पात्रांच्या जगण्यावरही जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. त्यातील गाडगीळ सारख्या अल्पशिक्षितांना जागतिकीकरण नको वाटते त्यामुळे तो जागतिकीकरणाला विरोध करतो, शिव्या घालतो कारण या प्रक्रियेमध्ये त्याला पटापट नोकऱ्या मिळत व कारखान्यात अडचण निर्माण झाली की पटापट नोकऱ्या जात. खुल्या आर्थिक धोरणातील नव्या कामगार कायद्यांमुळे तर गाडगीळ जागतिकीकरणावर जास्तच चिडून असतो. दुसऱ्या बाजूला कोमलिनी कुलकर्णी ही उच्चविद्याविभूषित असल्याने

जागतिकीकरणाशीच संबंधित असते. कारण ती उच्चशिक्षित स्पेशालिस्ट होती. तिच्या क्षेत्रात खूपच लोक काम करत असल्याने स्पर्धा खूपच तीव्र होती. त्यामुळे तिचा व्यवसायात जम बसला नव्हता. याचाच अर्थ उच्चशिक्षित व्यक्तीपासून ते अल्पशिक्षित व्यक्तीपर्यंत जागतिकीकरणाची प्रक्रिया पोहचलेली आहे व त्या प्रक्रियेने त्यांना ग्रासले आहे, जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहमध्ये ते अडकले आहेत.

जागतिकीकरणाच्या या परिस्थितीत कोमलिनीला यशस्वी होण्यासाठी, ती ज्यांची संरचना करीत असे अशी मेडिकल इक्विपमेंट्स हिंदुस्थानात जास्त प्रमाणात वापरली जाणे आवश्यक होते. त्यासाठी, ती लागतील असे जास्त पेशंट्स व्हायला पाहिजेत. तसे पेशंट होते पण ते गरीब होते. म्हणजे एकतर लोकसंख्या तरी वाढायला पाहिजे नाही तर गरिबी दूर व्हायला पाहिजे. हे दोन्ही कोमलिनीच्या कक्षेबाहेरचे होते. अशा परिस्थितीत तीची या प्रक्रियेच्या चक्रव्यूहातून सुटका होत नव्हती. गाडगीळ फक्त इंजिनिअरिंगचा डिप्लोमा होल्डर होता. नव्या कामगार कायद्यामुळे त्याला नोकरीमध्ये स्थिरता लाभत नव्हती म्हणून तो जागतिकीकरणाच्या विषयावर अच्युत आठवलेशी बोलताना संताप व्यक्त करतो. तो म्हणतो, 'मिस्टर आठवले, तुमच्यासारख्या लोकांमुळेच माझी नोकरी गेली,' 'तुम्ही सरकारला नाही नाही ते सांगता.' 'मी ऐकलयं तुमच्या गेल्या भाषणात. तुम्ही नव्या खुल्या आर्थिक धोरणाचे हे... म्हणजे पुरस्कर्ते आहात. मी ऐकलयं तुम्हाला त्या बाजूने बोलताना.' 'तुम्हाला हवीये ही नवी व्यवस्था, आणि नवे कामगार कायदे...' (पृ. क्र .५१)

भगत आणि सोनसळे हे ग्रामीण भागातले सुशिक्षित दलित कार्यकर्ते होते. त्यांच्या संस्थेला गावात संगणक शिक्षण देण्याची शाळा काढण्यासाठी अमेरिकेच्या पर्यावरण फंडातून यु एन तर्फे देणगी मिळाली होती, जोशी आणि साने गेली अनेक वर्ष एका संस्थेतून प्रायोगिक नाटके करीत असत. त्यांना वेगळी संस्था काढून एथ्निक विषयावर नाटके करण्यासाठी फोर्ड फाऊंडेशनकडून पैसे मिळाले होते. म्हणजेच जागतिकीकरणाचे हे लोन ग्रामीण भागापासून ते सांस्कृतिक घडामोडीपर्यंत पोहचलेले दिसते. याप्रसंगी भगत आणि सोनसळे यांच्या पुढची मुख्य समस्या ही होती की, असा शिक्षणक्रम चालू करून संस्थेत सर्वांना संगणक शिक्षण दिले तर पुढे त्या मुलांचे आर्थिकदृष्ट्या काय होणार ? तशी नवी पिढी आल्यावर त्या समाजाचे काय होणार ? इतर देशांकडून संगणक शिक्षणासाठी मदत, प्रायोगिक

नाटकासाठी मदत, मनोरंगाश्रम काढण्यासाठी मदत या घटनांतून लेखकाने आधुनिकीकरणातून येणारा दुर्बलपणाही सूचित केला आहे.

शमा मुळे ही प्रसिद्ध चित्रपट तारका असली तरी तिच्या वैयक्तिक जीवनावरच जागतिकीकरणामुळे निर्बंध घातले गेले आहेत. आपल्या चाकोरीबद्ध जगण्याबद्दल बोलताना दुःखी स्वरात ती म्हणते, 'सर, सगळं सेक्रेटरी ठरवतो माझं. माझा सगळा दिवस नीट एफिशिअंटली जावा म्हणून ही स्लॉगस् ॲण्ड स्लॉगस्, पावणेसात-अंघोळ, सात-ब्रेक फास्ट, साडेसात - पहिली शिफ्ट, सव्वाअकरा - स्विमिंगसाठी ब्रेक' (पृ. क्र. १०७)

कधीही च्युत न होणारा अच्युत आठवले हा विचारवंत अर्थशास्त्रज्ञही ह्या जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहामध्ये अडकून पडतो. संपर्क साधण्यासाठी संगणकाचा उपयोग करतो. तरीही समाजापासून अलग पडत जातो. बोधनीचा खून करतो. प्रथम कोठडीत व नंतर मनोरंगाश्रमामध्ये अडकून पडतो. म्हणजेच एकंदरीत जागतिकीकरणाच्या या चक्रव्यूहातून कोणाचीच सुटका होत नाही हे दिसून येते. कादंबरीतील चांदणी टी. व्ही. ची स्टार रिपोर्टर संवादिनी ही बाजारू माध्यमाची प्रतिमा म्हणून कांदबरीत येते. 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील कथानक हे पुण्यात घडत असले तरी आजूबाजूच्या खेड्यांची नावे मात्र नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क अशी आहेत. हाही जागतिकीकरणाचाच एक भाग आहे.

एकविसाव्या शतकातील आर्थिक उदारीकरण, समाजातील विविध संस्था नि व्यक्ती यांचा अहंकार, भ्रष्टाचार, जीवनातील अनिश्चितता, गळेकापू स्पर्धा, आयुष्याची प्रचंड गतीमानता ही सर्व आच्युत आठवलेंच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेतून लेखकाने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व जागतिकीकरणाची अपत्ये आहेत. आणि या चक्रव्यूहातून प्रयत्न केला तरी बाहेर पडणे मुश्किल आहे.

## २.२.२ राजकीय भाष्य

अच्युत आठवले हा कादंबरीचा नायक जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहामध्ये अडकून त्याची वाताहत ही 'अच्यूत आठवले आणि आठवण' या कादंबरीची कहाणी असली तरी या कादंबरीचा निवेदक राजकीय घडामोडीविषयी परखडपणे भाष्य करताना दिसतो. हे भाष्य करताना निवेदकाचा सूर उपरोधी व उपहासात्मक स्वरूपाचा आहे.

''सकाळ झाली तोपर्यंत बोरिस बेकरचे तिसरे लग्न मोडले होते, पेट्रोल आणि

डिझेलच्या किंमती वाढल्या होत्या, अमेरिकेचा परराष्ट्रमंत्री परत भारताच्या बाजूने बोलला होता, रिपब्लिकन पार्टीची परत दुफळी होऊन एक हिस्सा शिवसेनेला जाऊन मिळाला होता. तीनशे तेहतीस छोटी गावं काल संगणकाने या सगळ्या जगाला जोडली गेली होती, त्या उद्घाटनाला पंतप्रधान स्वत: गेले होते.'' (पृ. क्र. ७४)

''अण्णाभाऊ परांजपे मागच्या पिढीतील एक महत्त्वाचे पण फारशा लोकांना माहित नसलेले सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योगपती होते. ते ब्राह्मण होते पण त्यांनी दलितांसाठी मोठेच कार्य केले होते. आंबेडकरांचे ते भक्त हाते. अण्णाभाऊ मेले तेव्हा बरेच श्रीमंत होते. आधी ते गरीब होते, पण नंतर ते स्वकर्तृत्वाने आणि सरकारच्या प्रोटेक्शनिस्ट पॉलिसीजने ते खूप श्रीमंत झाले होते. ते समाजवादी चळवळीचे नेते होते. फार कोणास ते ठाऊक नव्हते.'' (पृ. क्र. ५५)

''या दोन्ही अवतरणांमधला तरल विनोद आणि त्यातले कुठाराघात करणारे राजकीय विधान सगळ्या राजकीय प्रक्रियेचे नागर मध्यमवर्गीयांच्या लेखीचे निरर्थकत्व एकदम ठळठळीत करते.''[२] असे गो. पु. देशपांडे म्हणतात ते योग्यच आहे.

राजकारण आज कोणत्याही गोष्टीमध्ये प्रवेश करू लागले आहे, त्याला कोणत्याही क्षेत्राची मर्यादा राहिलेली नाही. साध्या-सामान्य गोष्टींपासून ते जागतिक घडामोडीपर्यंत राजकारण सदैव चालू असते. त्यामुळे कादंबरीचा निवेदकही त्यावर भाष्य करताना उपरोधीकपणाचा सूर लावतो.

''अच्युतला म्रेझनमध्ये आणले होते. म्रेझन म्हणजे मेंटल हॉस्पिटल आणि प्रिझन यांच्या मधील संस्था. न्यूझीलंडमध्ये यावर मोठ्या प्रमाणात संशोधन झाल्याचे त्याने वाचले होते. आपल्याकडे म्रेझन चालू होणार अशी बातमीही त्याने वाचली होती. आपल्याकडे त्याचे नाव (मनोरूग्णालय + तुरूंग या अर्थी) मनोरंगाश्रम ठेवावे का मानंग ठेवावे यावर भाजप आणि काँग्रेसमध्ये वाद झाला होता आणि भाजपचे राज्य असल्याने पहिले नाव मुक्रर झाल्याचेही त्याने ऐकले होते.'' (पृ. क्र. १०) राजकारणाचे हे लोन जग, देश, संस्था यांच्यापासून ते व्यक्तींच्या दैनंदिन जगण्यापर्यंत पोहचलेले आहे. म्हणून तर सदानंद वृद्धाश्रमातील दोन म्हाताऱ्या बायकांबद्दल बोलताना निवेदक म्हणतो, ''अशा कोणाशीही न बोलणाऱ्या, दिवसभर एकटक अंतरळात बघत बसणाऱ्या दोन म्हाताऱ्या बायका होत्या. त्यांना बोलताना वा हसताना कोणीही कधी पाहिले नव्हते. त्यांचे आपापसात एक अंतर्गत

राजकारण चालू असे इतरांचेही राजकारण चालू असे'' (पृ. क्र. ८४)

उच्चवर्णीय अहंतेतून उद्भवणारी राजकारणाविषयीची समजूत काय असते ते अच्यूत आठवले आणि मनोरंगाश्रमाचे अधिकारी यांच्या संवादामधून दिसून येते.

| | | |
|---|---|---|
| 'अधिकारी १ | – | 'आपण अच्युत आठवले ?'' |
| अच्युत | – | 'हो' |
| अधिकारी २ | – | 'ब्राह्मण' |
| अच्युत | – | 'हो' |
| अधिकारी ३ | – | 'तुमचं अमेरिकेत कोणी नातेवाईक ? |
| अच्युत | – | 'अहो असणारचं' |
| अधिकारी ४ | – | 'कोणी राजकारणात ?' |
| अच्युत | – | 'कुठे ?' |
| अधिकारी ४ | – | 'राजकारणात' |
| अच्युत | – | 'कुठे पण ?' |
| अधिकारी ४ | – | 'कुठे म्हणजे ? राजकारणात ?' |
| अच्युत | – | 'पण राजकारणात कुठे ?' (पृ. क्र. ९) |

अच्युत आठवले या विचारवंतांची कोर्टकेस व त्याबद्दल केले जाणारे राजकारण हे तर खूपच वरच्या पातळीपर्यंत पोहचलेले आपल्याला कांदबरीमध्ये दिसून येते. अच्युतला न्याय मिळावा यासाठी अमेरिका आणि भारत यांच्यात तणाव निर्माण होतो, एवढेच नव्हे तर जगभरच्या मानवी हक्कवादी संघटनामध्ये अच्युतच्या कोर्टकेसमुळे दुफळी निर्माण होते. पंतप्रधान कॅबिनेट मिटिंगमध्ये अच्युतबद्दल बोलतात. अमेरिकन अध्यक्षपदाच्या शर्यतीत असणाऱ्या दोन्ही उमेदवारांचे एकाचवेळी फोन पंतप्रधानांना येतात. असे आणि अशाच स्वरूपाचे निरोप मग देशातून आणि परदेशातून येतच राहतात. शेअर बाजार कोसळले जातात. युतीमधला एक मंत्री मलेशियातून राजीनामा पाठवतो. हे सर्व राजकारण अच्युत आठवलेसाठी चालू असते. परंतु त्याची पुसटशी कल्पनाही अच्युतला नसते हा विरोधाभास कादंबरीमध्ये दिसून येतो.

अच्युत आठवलेसारखी विद्वान मंडळी जेव्हा जोमाने संस्था उभ्या करत असत तेव्हा त्यामध्ये इंदिरा गांधी, राजीव गांधी यासारखे राजकीय व्यक्तीही लक्ष घालतात आणि त्यापासून

अच्युतला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच राजकारण हा या कादंबरीतील एक अपरिहार्य असा घटक आहे हे आपल्या लक्षात येते.सर्वसामान्य व्यक्तींच्या जगण्याचाही राजकारण हा एक अपरिहार्य भाग बनला आहे हे गाडगीळ आणि अच्युत आठवले यांच्या चर्चेमधून दिसून येते. तो अच्युतला म्हणाला, ''पण आजच्या पेपरात आलंय अमेरिकन परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तानला चांगली तंबी दिलीये. आता काश्मिरबाबत एकदा का अमेरिका आपल्या बाजूला आली, तर मग आपण, अमेरिका आणि इंग्लंड, फ्रान्स एका बाजूला आणि चीन, पाकिस्तान, एका बाजूला.''

(पृ. क्र, ५४)

एकंदरीत सर्वसामान्य व्यक्ती, विद्वान प्राध्यापकांपासून ते पार इस्त्रायल – पॅलेस्टाइन वाद इ. बद्दल केले जाणारे राजकारण व त्याचे परिणाम यावर निवेदक आणि अच्युत आठवले –उपरोधक शैलीमध्ये भाष्य करताना दिसतो. सर्वसामान्यांच्या नसानसामध्ये भिनलेले राजकारण देशा–देशांच्या प्रश्नांमध्येही वापरले जाते व पर्यायाने सुटू शकणारे प्रश्न चिघळत ठेवले जातत. या स्वरूपाचे राजकीय भाष्य या कादंबरीमध्ये येताना दिसते.

### २.२.३ प्रसारमाध्यमांचे अवास्तव स्तोम

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये प्रसारमाध्यमांचे अवास्तव स्तोम वाढू लागले आहे. त्याचे स्पष्ट प्रतिबिंब 'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीमध्ये उमटते. गतीमान जीवनामध्ये प्रसारमाध्यमे व्यक्तींच्या घरापर्यंत पोहचली आहेत. त्यांच्या वैयक्तिक जगण्यावर आक्रमण करू लागली आहेत. कोणतीही घटना वेगाने व आपल्याच चॅनेलकडून सर्वप्रथम लोकांपर्यत पोहचली पाहिजे या इर्ष्येतून मूळ सत्य बातमीचा विपर्यासही केला जातो व त्यातून दंगली भडकण्याचे प्रकारही घडून येतात. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये गर्दीकडून निर्णय घेतले जातात त्यामुळे सत्याचा विपर्यास होतो.

अच्युत आठवलेने बोधनीचा खून केला आहे हे त्याने स्वत: मान्य करूनही प्रसारमाध्यमातून संवादिनी मात्र ज्यावेळी अच्युतने खून केला होता त्यावेळी त्याचे मनोस्वास्थ ढळले होते हे सांगण्याचा प्रयत्न आपल्या चॅनेलवरून करते. कारण ती अच्युतच्या प्रेमामध्ये पडलेली असते. या ठिकाणी मूळ सत्य गोष्टीचा विपर्यास मात्र केला जातो. म्हणजे प्रसारमाध्यमेही तटस्थ भूमिका न घेता वेगळी भूमिका घेताना दिसतात. या प्रसारमाध्यमातून उघडल्या गेलेल्या आघाडीमुळे सरकारला आपले निर्णय बदलावे लागतात हे प्रसारमाध्यमांचे वाढते स्तोम चुकीचे आहे यावर भाष्य करताना निवेदक म्हणतो, ''प्रसिध्दी माध्यमातून चालू झालेली हीच केस त्याच पुराव्यावर अवलंबून वेगळी वळणे घेत

होती.'न्यायप्रविष्ट' गोष्टी मोठ्या खुबीनं टाळून, म्हणजे बहुतेक साऱ्या गोष्टी कायद्याला योग्य ते वळसे घालत आत घेत, तिने अच्युतचे सर्व चरित्रच रंगवण्यास सुरुवात केली. अच्युत आपली बाजू न्यायालयात मांडण्यासच कसा तयार नाही, चांगला वकील घेण्यास कसा तयार नाही, नकळत केलेल्या गुन्ह्यासाठीसुद्धा शिक्षा भोगण्यास कसा तयार आहे, इत्यादी गोष्टी सांगण्यास सुरुवात केली... त्याच्या हरवलेल्या स्मृतीबद्दल मनोविकार तज्ज्ञांस बोलावून, त्यांच्या मुलाखतीतून विदारक अशी शास्त्रीय माहिती द्यायला सुरुवात केली.'' (पृ. क्र. १४८)

प्रसारमाध्यमांचे हे आक्रमण घरापर्यंत पोहचले आहे. अच्युतच्या केसवरून 'भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये तणाव निर्माण होतो.' हा बातमीचा विषय बनतो. अच्युत आपल्या व्याख्यांनामध्ये अण्णाभाऊ परांजप्यांबद्दल जे काही बोलतो ते प्रसारमाध्यमांपर्यंत पोहचते. अच्युतच्या विधानाचा विपर्यास केल्याने दंगे अधिक भडकतात. त्यावरून अच्युतला फोनवर ज्यावेळी धमकी दिली जात होती त्याचवेळी या धमकी संदर्भाचे वृत्त टी. व्ही. चॅनेलवरून प्रसिद्ध होत होते म्हणजे प्रचंड गतीमान अशा स्पर्धेच्या युगामध्ये प्रसारमाध्यमेही वेगवान बनली आहेत. परंतु त्यांचे सार्वजनिक जीवनावर व वैयक्तिक जीवनावर होणारे परिणाम मात्र घातक आहे असे मकरंद साठे यामधून सूचित करतात.

प्रसारमाध्यमांच्या विशिष्ट प्रकारच्या प्रसारण प्रक्रियेतून निर्माण होणारे काही भाग सांस्कृतिक अंर्तप्रवाहावर सूक्ष्मपणे पण महत्त्वाचे परिणाम करतात. उदाहरणार्थ, दर अर्ध्या तासांनी बातम्या असतात. त्या असतात म्हणून अनेक मंडळी त्या बघतात. असे दर अर्ध्या तासाने बातम्या ऐकणे अनेक भावनिक व सांस्कृतिक बदल घडवणारे असते, परंतु हे अर्ध्या-अर्ध्या तासाने, झिंगल्यासारखे बघणे वेगळाच प्रकार आहे. त्यातून जाणिवा आणि संवेदनक्षमता तीव्र होण्याऐवजी एक बथ्थड सुन्नता येते. हे फक्त श्रोत्यांच्या बाबतीमध्येच घडत नाही तर जे रिपोर्टर या बातम्या प्रसारित करतात त्यांची वैयक्तिक जीवनातील भाषा संवेदनाशून्य असते. या कादंबरीतील संवादिनी अच्युतला म्हणते,

''काही विशेष बातमी नाही... काही नाही... स्वीडनमध्ये काल दोन खून, डेन्मार्कमध्ये एक. अगदी नॉर्मल स्टॅटिस्टिक्सप्रमाणे चाललंय सगळं. नो बडी विल बी इन्स्ट्रेस्टेड इन सच न्यूज. इन फॅक्ट, देअर इज नो न्यूज !'' (पृ. क्र. १०५)

## २.२.४ उच्चमध्यमवर्गीयांच्या आयुष्याच्या निरर्थकत्वाची कहाणी

'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील प्रकाश कुलकर्णी, कोमलिनी कुलकर्णी, गाडगीळ ही उच्चमध्यमवर्गीय मंडळी त्यांच्या आयुष्याच्या निरर्थकत्वाची ही कहाणी आहे. यासंदर्भात.डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, ''साठे यांच्या अच्युत आठवलेच्या बाबतीत तेच झाले आहे.

त्यात त्याला वाटणारी जीवनाबद्दलची निरर्थकता आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जीवनोत्सहाचा भाग अभावानेच जाणवतो. थकवा आणि कंटाळाच अधिक आहे. त्यात समाजातील सुप्रतिष्ठित मूर्तींची, मूल्यांची मोडतोड करण्याची प्रवृत्ती अधिक आहे. ही कादंबरी म्हणजे एका उच्च मध्यमवर्गीयांची, त्यांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या भयाण पोकळीची कथा आहे.''[३]

या कादंबरीमध्ये येणारी अच्युत, प्रकाश कुलकर्णी, कोमलिनी कुलकर्णी, शमा मुळे, संवादिनी, गाडगीळ ही मंडळी वरवर पाहता अर्थपूर्ण जीवन जगताहेत असे जाणवत असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या आयुष्यातील निरर्थकताच अनेक प्रसंगातून प्रकट होते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये हे सर्वजण उच्चशिक्षित, व्यावसायिक, विचारवंत, प्राध्यापक, कलाकार आहेत. परंतु या प्रक्रियेने त्यांचे स्वत्व हिरावून घेतले आहे. त्यांचे अस्तित्वच या प्रक्रियेमध्ये पुसट होत गेले आहे. त्यांच्या अस्तित्वाची वेगळी ओळखच राहिली नाही. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने त्यांना विकतच घेतलं आहे. त्यामुळे त्यांनी स्वत:चे स्वातंत्र्य गमावले आहे. आपण विकले गेल्यामुळे आपला निर्णय आपल्याला घेता येत नाही म्हणून तर चित्रपट तारका शमा मुळे हिला स्वत:चा निर्णय स्वत: घेता येत नाही. म्हणजे तिच्या जीवनामध्ये अर्थपूर्णता भासत असली तरी ती आभासात्मकच आहे. म्हणून तर ही कांदबरीच उच्चमध्यमवर्गीयांच्या आयुष्यातील निरर्थकत्वाची कहाणी आहे. जागतिकीकरणाच्या या चक्रव्यूहामध्ये तर उच्चमध्यमवर्गीयांच्या आयुष्यातील निरर्थकत्व अधिक गडद बनले आहे. त्यावेळी 'स्व' चे काय ? असा प्रश्न नकळत उपस्थित होतो. म्हणून निवेदक सांगतो,

''अनेक कंपन्या म्हणजे इन्फॉसिज, सत्यम, टाटा इत्यादी आजकाल बऱ्याच गोष्टी कंपनीतच आपल्या सेवकांना उपलब्ध करून देतात. म्हणजे स्विमिंगपूल, रेस्टॉरंट, झोपायची जागा, कुटुंब आलं तर त्यासहित झोपायची जागा, व्यायामशाळा, सगळं... आपल्या कर्मचाऱ्यांना असे सगळे उपलब्ध करून दिल्याने कर्मचाऱ्यांना बरे वाटते, आणि त्याच वेळी ते कायम, चोवीस तास, विकत घेतले गेल्यासारखे, एखाद्या धुंदीत असल्यासारखे कंपनीच्या कामाला बांधून घातले जाऊ शकतात.'' ( पृ. क्र. १०१) या अवतरणामधून कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी किती सुविधा उपलब्ध करून देतात, त्यांच्या हितासाठी किती प्रयत्न करतात असे वरवर पाहता जाणवते. परंतु प्रत्यक्षात मात्र त्या व्यक्तीचे स्वातंत्र्यच यामुळे हिरावून घेतले जाते हे स्पष्ट होते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने या उच्चमध्यमवर्गीयांचे आयुष्य कृत्रिम, साचेबंद स्वरूपाचे बनले आहे. ते निसर्गापासून दूर चालले आहेत. नैसर्गिक मूळ भाव-भावनांचा आनंद त्यांना मनसोक्त घेता येत नाही. कारण ती सर्व विज्ञान व

तंत्रज्ञानाची गुलाम झालेली आहेत म्हणून तर प्रत्यक्ष चंद्रग्रहण पाहताना शमा मुळेला भीती वाटते त्याचप्रमाणे संवादिनीलाही भीती वाटते व त्यावेळी ती हे दृश्य टी. व्ही. वर दाखवत असतील असे मत नोंदवते.

गाडगीळला कमी पगार असल्याने हाताला लागलेले असतानाही सुट्टी घेणे त्याला परवडणारे नसते. जोराचा ताप आलेला असतानासुद्धा तो आठ दिवस कामावर जातो. म्हणजेच या सर्वांचे आयुष्य जे आखून दिलेले आहे त्याचपद्धतीने चालत राहते त्यामध्ये थोडाही बदल करण्याचा अधिकार त्यांना वाटत नाही. जागतिकीकरणाच्या लाटेत या व्यक्तींच्या 'ओळखीचं, अस्मितेचं काय होणार हा एक प्रश्न लेखक या कादंबरीमधून उपस्थित करतो. एकदा व्यक्तीच्या जगण्यामध्ये कृत्रिमपणा आल्यानंतर तो त्याच्या भाषेमधूनही व्यक्त होतो. म्हणून तर कादंबरीत संगणकावर किंवा सेलफोनवर शोभावीत अशी आयुष्याविषयीची विधाने येतात.

''एकमेकांचे कुल्ले बघत चालत राहणे ऐवढाच संपर्क. इथं, 'माणूस हा सामाजिक प्राणी आहे' या तत्त्वास वेगळे अर्थ प्राप्त होत. ज्यांच्यात काहीही संबंध नाही, पण जी एकमेकांशी तादात्म्य पावली आहेत अशा असंख्य माणसात एकटेपणा घालवण्याची सक्ती नसे. (पृ. क्र. ६३)

''वृध्दाश्रमातील बहुतेक मंडळी साधारणपणे खूपच आनंदात असायची. पृथ्वीवर अधूनमधून ज्वालामुखी भडकावा तसे उत्साहाचे स्फोट होत असत.'' (पृ. क्र. ८३)

''संवादिनी मॅथॉडिकल बाई, तिनं यादी केली.

१. जेवण

२. संगणकावर काम

३. माझ्याशी व इतरांशी अचानक संपर्क

४. शूटिंग

५. चंद्रग्रहण

६. दंगल

७. सहदेवला अटक (पृ. क्र. ११४)

''अच्युतची स्मृती खंडित झाली. ती परत चालू झाली. नळाचे पाणी जावे आणि नळाला परत पाणी यावे त्याप्रमाणे'' (पृ. क्र. ११८)

''मला बोधनीचा पूर्वापार राग होता. हा खून मी नीट विचार करून केलेला आहे.

किंबहुना मला आता असे अनेक लोकांना मारावेसे वाटते.'' (पृ. क्र. १४०)

''अच्युत म्हणाला, ''माझी केस न्यायप्रविष्ट आहे. मी काहीही बोलू शकत नाही.'' (पृ. क्र. १४६)

यासारख्या असंख्य अवतरणांमधून उच्चमध्यमवर्गीयांचे कृत्रिम व साचेबंद जगणे, बोलणे त्यांच्या दैनंदिन व्यवहारांमधून दिसून येते.

### २.२.५. नैतिकता

''नैतिकता हेच कलात्मक कांदबरीचे संघटनातत्त्व होय.''[४] असे डॉ. वासुदेव सावंत नैतिकतेच्या बाबतीत म्हणतात तर लेखकाची नैतिकता सांगताना डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''साहित्य हा कलाप्रकार असल्यानं सामाजिक मूल्यांपलिकडची उच्चतर स्थिती लेखकाला अभिप्रेत असावी लागते यालाच मी लेखकाची नैतिकता समजतो.''[५]

डॉ. सावंत व डॉ. नेमाडे यांना अभिप्रेत असणारी नैतिकता 'अच्युत आठवले' या नायकाच्या भूमिकेतून कादंबरीमध्ये वारंवार प्रकट होते. कादंबरीमध्ये आलेली नैतिकता ही लेखकाची नैतिकदृष्टी स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहे.

अच्युत आठवले यांचा अनेक संस्था उभा करण्यात हातभार होता. इंदिरा गांधी इत्यादी मंडळी जसजशा संस्था तोडत गेली तसतसा अच्युत जास्त चेवाने संस्था उभारण्याच्या कामी लागतो. तेव्हा श्री. राजीव गांधी अच्युतला एका सरकारी अर्थविषयक संस्थेचे अधिकारपद देऊ करतात परंतु अच्युत आठवले हा प्रस्ताव नम्रपणे नाकारतो.

अच्युत अण्णाभाऊ परांजपे यांच्याविषयी आपल्या व्याख्यानात जे बोलतो त्याचा विपर्यास प्रसारमाध्यमातून केला जातो त्यामुळे पूर्वी चालू असलेले दंगे अधिकच भडकतात. अच्युतला धमकीचे फोन यायला लागतात तेव्हा सुरक्षिततेच्यादृष्टीने त्याचा मित्र कड पोलिसांना कळवण्याची विनंती करतो परंतु अच्युत आपल्या विधानामुळे भडकलेल्या दंग्याची झळ सहन करण्याची तयारी दर्शवितो म्हणजे तो या वास्तवापासून पलायन करत नाही. ही अच्युतची नैतिकता याठिकाणी स्पष्ट होते.

नॉर्वेतील सहदेव अच्युतकडे नित्यनियमाने येत असे. अशा सहदेवला त्यानं स्वीडनमधल्या एका उच्चवर्णीय मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपाखाली अटक होते. त्यामुळे नॉर्वे आणि स्वीडनमध्ये दंगे उसळलेले असतात. त्यावेळी अच्युतला आठवते सहदेववर केलेला हा आरोप चुकीचा आहे. कारण ज्यावेळी सहदेवने मुलीचा विनयभंग केला असा आरोप त्याच्यावर असतो

त्याप्रसंगी सहदेव अच्युतबरोबर असतो. म्हणून तो सहदेवला विनाकारण शिक्षा होऊ नये म्हणून सहदेवच्या बाजूने दंगा चालू असतानाही साक्ष देण्यासाठी पोलिस स्टेशनकडे धावतो. परंतु तो स्टेशनपर्यंत पोहचू शकत नाही नंतर त्याची स्मृती जाते. स्मृती परत येते. तो बोधनीचा खून करतो. अच्युतची कोठडीत रवानगी होते. अच्युतकडून बोधनीचा खून झाला त्यावेळी अच्युतची स्मृती गेली होती असे मांडण्याचा प्रयत्न संवादिनी अच्युतच्या प्रेमापोठी प्रसारमाध्यमांतून करते. परंतु अच्युतला ते चुकीचे वाटते. कारण अच्युतची स्मृती गेली होती हे जर स्पष्ट झाले तर सहदेवच्या प्रकरणातील अच्युतच्या साक्षीला काही महत्त्वच उरणार नाही म्हणून तो संवादिनीला म्हणतो, ''माझ्या केसचा निकाल लागण्याआधी, त्याच्या केसचा निकाल लागायला हवा. सहदेव त्या संध्याकाळी माझ्याबरोबर होता. त्याच्यावर झालेले आरोप खोटे आहेत. त्यानं तसं कधीही केललं नाही. त्यासंबंधातली निदान माझी साक्ष, माझ्या केसचा निकाल लागण्याआधी व्हायला हवी. काहीही करून त्याच्या वकिलाला घाई करून माझी साक्ष घ्यायला भाग पाड.'' (पृ. क्र. १४७) अच्युतकडून ज्याप्रसंगी बोधनीचा खून होतो. त्याप्रसंगीही अच्युत स्वत:च्या बचावाचा प्रयत्न करत नाही तो म्हणतो, ''संवादिनी, मी मारले बोधनीला जाणून बुजून. पोलिसांना बोलावं.'' (पृ. क्र. ११६) कांदबरीतील नायकाची व निवेदकाची ही नैतिकता अनेक घटना–प्रसंगातून पुढे येते. निवेदक अमेरिकेविषयी परखडपणे भाष्य करताना म्हणतो, ''अमेरिका आणि संगणक मध्ये आले की प्रकरण समेटानं मिटवताच येत नाही.'' (पृ. क्र. १५) ''थोडक्यात अमेरिका आणि संगणक या दोंन्ही गोष्टी मध्ये आल्या तर सुटायला सुरुवात झालेला प्रश्न चिघळतो.'' (पृ. क्र. १६) ''गावात संगणक शिक्षण देण्याची शाळा काढण्यासाठी अमेरिकेच्या पर्यावरण फंडातून यू एन तर्फे देणगी मिळाली होती. अमेरिकेने आजतागायत पर्यावरणाची जी हानी केली. त्याचे प्रायश्चित म्हणून हे फंड दिले जातात.'' (पृ. क्र. ३२) यासारख्या अवतरणांमधून निवेदकाचा रोखठोकपणा व त्यातील त्याची नैतिकता आपल्या निदर्शनास येते. निवेदक प्रसिद्ध विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ आणि प्राध्यापक अच्युत आठवले यांच्या व्याख्यानाबाबत म्हणतो, ''एक कार्यकर्ता प्रचंड मोठा गुच्छ घेऊन हजर होता. नऊ लोकं व्याख्यान ऐकायला जमलेली होती.'' (पृ. क्र. ५६)

या अवतरणांमधून आजच्या बुध्दीमंताचे जग समाजापासून कसे तुटले आहे हे मकरंद साठे त्यामधून सूचित करतात.

### २.२.६ साहित्यिक भाष्य

मकरंद साठे ''सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण' या पुस्तिकेत आपली साहित्यविषयक भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, ''प्रत्येक क्षणी व्यक्तीला भूमिका घ्याव्याच लागतात. त्या घेण्यासाठी भान, ज्ञान असणे आवश्यक आहे हे ज्ञान व भान देणे हे काम इतर ज्ञानशाखांपेक्षा, साहित्याचे व कलांचे आहे असे मला वाटते.''[६]

कलाकृतीचे मर्म सांगताना ते म्हणतात – 'एकतर कलाकृती 'संपूर्णपणे कळली पाहिजे,' 'स्पष्टपणे कळली पाहिजे', 'दोन वाक्यात त्याचे मर्म सांगता आले पाहिजे.'[७] मकरंद साठे यांची ही जी साहित्यविषयक धारणा आहे तीच त्यांच्या कादंबरीतून प्रकट होते. कादंबरीचा नायक, निवेदक साहित्याबद्दल भाष्य करताना साठे यांच्या या भूमिकेचीच पुर्नमांडणी करताना दिसतात. त्यांचा निवेदक साहित्य व समीक्षा याबद्दलचे विचार मांडताना दिसतो.

कांदबरीबद्दल अच्युत म्हणतो, ''कादंबरी वाचणे वेगळे आणि माहिती घेणे वेगळे. हे दोन प्रवास वेगळे आहेत. आपले भान आपण त्याप्रमाणे आखत असतो. कादंबरी वाचताना काही पथ्ये पाळावी लागतात. काही नाही लागत. कादंबरी वाचताना कोपर कुठेही लागले तरी चालते. माहिती मिळवत असताना तसे उपयोगाचे नाही. कादंबरी वाचताना वेगळेच काही डोळ्यासमोर आले तर गडबड झाल्याचे लक्षात येण्याची शक्यता असते. माहिती मिळवत असताना ती नसते.'' (पृ. क्र. १४)

जून्या साहित्यसक्षीमेचा समाचार घेताना या कादंबरीचा निवेदक म्हणतो, ''गोष्ट मधूनच चालू करून वर्तमानातच ठेवण्याच्या इच्छेचा हा दुष्परिणाम आहे. पण आम्हाला त्यातच रस आहे तेंव्हा उपाय नाही. भारंभार वर्णनपर गोष्टी सांगण्यात वा वाचण्यात कोणाला का रस असावा हे आम्हांस कळत नाही. वाचकाने आपले संदर्भ घेऊन यावेत आणि आम्ही आमचे.'' (पृ. क्र. ३०) सध्याच्या साहित्याची, दुरावस्था सांगताना त्यावर उपरोधीकपणे हा निवेदक भाष्य करतो. तो म्हणतो, ''अच्युत एखाद्या नाटकातून वा कादंबरीतून त्याच्या लेखकाला वा दिग्दर्शकाला अभिप्रेत नसलेला अर्थ काढत असे. मग अच्युतने काढलेल्या अर्थामुळे ते नाटक वा पुस्तक बुद्धिमान लोकांमध्ये फारच फेमस होऊन, बारा, तेरा किंवा पंधरा लोकं ते पाहत किंवा वाचत असत. त्या लेखकाचा बोलबाला होई. त्याच्या पुढच्या लिखाणांकडे मंडळी उत्सुकतेने पाहू लागत. त्या लेखकाचे पुढचे पुस्तक खरे तर पहिल्यापेक्षा बरे असे म्हणजे लेखकाच्या दृष्टीने. पण अच्युतला त्यात काही दिसत नसे मग लोकांची आणि म्हणून लेखकाची

निराशा होई.'' (पृ. क्र. ४९)

निवेदकाने प्रचलित साहित्यावर केलेली ही बोचरी टीका कडवट असली तरी आपल्या साहित्यविश्वाचे वास्तवदर्शन करण्याचे काम हा निवेदक करतो. साहित्यामध्ये प्रचलित असलेले अभिजातवाद, वास्तवाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद, आधुनिकतावाद या कोणत्याही वादांमध्ये अडकून न पडता साठे यांचे लेखन त्यापलिकडे जाते. या वादांची बंधने आपल्या साहित्याला घालू नयेत म्हणून निवेदक ती स्वत: पुसट करून टाकतो.

''काय कुठे होतास ? पंधरा वेळा फोन केला मी. एखाद्या अस्तित्ववादी कादंबरीच्या नायकासारखा वागायला लागलास तू.'' (पृ. क्र. ७२)

चव्हाण परत विचारता झाला, ''आठवले, तुम्ही आधुनिकोत्तरवादी आहात का ?'' (पृ. क्र. १२६)

निवेदकाच्या या दृष्टीकोनामुळे साठे यांच्या लेखनाची भूमिका उघड होते.

साहित्यनिर्मितीच्या परिस्थितीबाबत भाष्य करताना मकरंद साठे म्हणतात, ''आजच्या परिस्थितीला सामोरे जाण्यात साहित्य / नाटकाला यश येणे अवघड गोष्ट व्हावी, त्यास वेळ लागावा, इतका आज होणारा सामाजिक बदल हा महत्त्वाचा आहे असे मी मानतो. महाराष्ट्र देशीच नव्हे तर जगभरात आज साहित्यनिर्मितीबाबत समाधानी परिस्थिती दिसत नाही.''[८] मकरंद साठे यांची ही साहित्यविषयक भूमिका कादंबरीतील त्यांचा निवेदक उचलून धरताना दिसतो. तो म्हणतो, ''एकतर असंगत नाटक हिंदुस्थानातल्या परिस्थितीशी संबंधित व्हावे अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी नाही असं त्याचं मतं होतं. त्यातून हिंदुस्थानातीलच काय कुठल्याही देशातील आजची समाजपरिस्थिती असंगत नाटकात यर्थार्थपणे अभिव्यक्त होते की नाही याबद्दल अच्युतच्या मनात शंका निर्माण होऊ लागली होती. त्याला एकंदरीने अशा प्रकारच्या नाटकांचा कंटाळाही येऊ लागला होता.'' (पृ. क्र. ८)

कादंबरीतील पवारची साहित्याबद्दलची नाराजी व्यक्त करताना निवेदक म्हणतो,

''पवार साहित्यप्रेमी होता. फारसे चांगले साहित्य हिंदुस्थानात लिहिले जात नाही याची त्याला खंत होती. चांगले साहित्य आणि आपले आयुष्य यांची सांगड तो घालू पाहत असे. भारतात चांगले साहित्य नसल्याने त्याची याबाबत सर्वांप्रमाणेच कुतरओढ होत असे, असे त्याचे मत होते. मग आयुष्याची सांगड घालणार कशी ?'' (पृ. क्र. १३७)

या पद्धतीने या कादंबरीचा निवेदक आपल्या खास उपरोधी व उपहासात्मक शैलीने

साहित्य, समीक्षा, प्रायोगिक नाटक, त्यातील नवे वाद यांचा समाचार घेताना दिसतो. निवेदकाचे हे भाष्य पूर्वीच्या साहित्यावर प्रकाश टाकते त्याचप्रमाणे तो समकालीन वास्तव व साहित्य यावरही प्रकाशझोत टाकतो, साहित्याचे वास्तव रूप वाचकांसमोर प्रकट करतो व त्याबद्दलचे एक भानही वाचकांना आणून देतो. मकरंद साठे यांचा हा निवेदक हिंदुस्थानातील समाजस्थितीबरोबर जगातील इतर देशातील समाजस्थितीही साहित्यनिर्मितीसाठी कशी आहे याचा निर्वाळा देतो. साहित्यसृष्टीमध्ये प्रचलित असलेले वाद यांच्या पलीकडे जाऊन आपल्या साहित्याचे मूल्यमापन व्हावे हीच मकरंद साठे यांची भूमिका निवेदकाकडून अधिक स्पष्ट होते.

### २.२.७. ज्ञान–विज्ञानातील फोलपणा

आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अशक्य असे काहीच उरलेले नाही. या प्रगत युगामध्ये विज्ञानाबरोबरच इतर ज्ञानशाखाही प्रगल्भ बनलेल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक समस्येवरती उपाय म्हणून समाज विज्ञानाकडे पाहू लागला आहे. प्रत्येक प्रश्नाला विज्ञान असे उत्तर मिळू लागले आहे परंतु या विज्ञानाच्याही काही मर्यादा असतात. त्या मर्यादा स्पष्ट करण्याचे काम साठे या कादंबरीमध्ये करतात. सर्वसामान्यपणे संगणक कधी चुकणारच नाही अशी अपेक्षा सर्वांना असते. परंतु व्यवहार आणि भावना यामध्ये संगणक गफलत करू शकतो. तो मानवाच्या भावना समजून घेऊ शकत नाही अशा भावना समजून न घेता संगणक जे भाकीत मानवाबद्दल करते ते चुकीचे असते. यासंदर्भात अच्युतचे विचार खूप बोलके आहेत.

अच्युतने बोधनीचा खून केल्यानंतर या केसमध्ये संगणकाची मदत घेतली जाते. अच्युतने खून करण्यापूर्वीचे वर्तन संगणकावरती फीड केले जाते तेव्हा संगणक भाकीत करतो, ''तुम्ही सर्वांपासून फटकून वागायचेत. यू व्हेअर अ वेरी अलूफ पर्सन. स्वत:चे काहीही तुम्ही कधी कोणाला सांगायचे नाहीत. तुम्ही समाजापासून तुटलेले होतात. असा माणूस कधी ना कधी खून करणार''
(पृ. क्र. १२७)

याठिकाणी खूनाबद्दलचे संगणकाचे भाकीत योग्य असले व अच्युतने बोधनीचा खून केला असला तरी अच्युतबद्दल जे भाकीत केले जाते ते सत्याचा विपर्यास करणारे असते म्हणून अच्युत रागावरती ताबा मिळवत ओरडूनच सांगतो. ''...मी खून केला ही अनप्रिडिक्टेबल घटना आहे. प्रिडिक्टेबल नाही... मी समाजापासून तुटलेला नव्हतो. मी एक होतो समाजातला मरून मरून एक राहत होतो... अगदी म्हातारासुध्दा होऊ देत नव्हतो स्वत:ला का, तर समाजातच राहण्यासाठी... मी, मला

काय वाटतंय ते सांगत होतो, दिसेल त्याला, आयुष्यभर...दुसरं काम केलं मी आयुष्यभर ? आं ? काय केलं ? संगणक आणि तुम्ही म्हणता तसा माणूस नाहीये मी'' – (पृ. क्र. १२७)

हे विज्ञान तंत्रज्ञान फक्त सत्याचा विपर्यास करते असे नाही तर ह्या संगणकाचा वापर करून इस्त्रायल – पॅलेस्टाइन यासारखे वाद सोडवण्याचे काम करण्याऐवजी संगणक ते प्रश्न अधिक चिघळतच ठेवील कारण इस्त्रायल – पॅलेस्टाइन वाद बराच काही आहे तरी तो तडजोडीने सोडवता येऊ शकतो परंतू या केसमध्ये संगणकामध्ये आला तर तो म्हणेल – तडजोड नको.

''अंतिमत: पूर्ण न्याय हवाच. तंत्रज्ञान प्रोग्रॅमच्या टोकालाच जाणार. प्रोग्रॅम असा ग्रे एरियात ठेवताच येत नाही. न्याय हवा ना ? मग, एक – त्याची अंतिम व्याख्या करा, आणि दोन – तो पूर्ण मिळालाच पाहिजे. अर्धवट काहीही चालणार नाही.'' (पृ. क्र. १६)

याठिकाणी साठे सांगतात की, संगणकाला अर्धवट काही चालत नाही परंतु संगणकाच्या ह्या धोरणामुळे देशातील असंख्य लोकांना वेठीला धरले जाते. पर्यायाने तडजोडीने मिटवणारे प्रश्न चिघळत ठेवले जातात. भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न कसा देशाची फाळणी होईना का पटकन सोडवला गेला. त्याकाळी संगणकाचे प्रस्थ नसल्याने देशाचे विभाजन होऊ देऊनही शहाण्या माणसांनी प्रश्न सोडविण्याची सुरुवात तर केली. त्याचवेळी काश्मिर, निजाम इ. प्रश्न एखाद्या संगणकाने, अतिम न्यायाच्या सोसापायी लावून धरले असते तर ? कदाचित आज परिस्थिती वेगळी दिसली असती म्हणजे संगणक हा कोणत्याही प्रश्नाचे अंतिम उत्तर असू शकत नाही उलट तो सुटणारा प्रश्नही संगणक अधिक चिघळत ठेवतो.

ज्ञान–विज्ञानातील निष्कर्ष देशा–देशामधील वाद सोडवण्यासाठी कुचकामी ठरतात तसेच ते निष्कर्ष व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनातही गुंतागुंत निर्माण करतात. अच्युतने बोधनीचा खून केल्यानंतर त्याला कोठडीमध्ये हलवले जाते. त्याठिकाणी अच्युत आपण हा खून केला आहे असे मान्य करतो. कारण होणारी शिक्षा त्याला आनंदाने स्वीकारायची असते. म्हणजे आरोपीने आरोप मान्य केल्यानंतर निकाल लवकर लागणे अपेक्षित आहे. परंतु अच्युतच्या या केसमध्ये अमेरिकन मानवी हक्कवादीमध्ये पडतात. ते केसच्या कामकाजात संगणक सहभागी करून घेतात. संणगक सर्व मुद्यांचा विचार केल्याशिवाय न्यायदान करत नाही. संगणक विचारतो, खून झाला त्यावेळेस आरोपीची मानसिक स्थिती कशी होती ? थोडक्यात तो पटकन 'फाशी' असा दोन्ही पक्षांना मान्य असणारा न्याय होऊ देणार नाही. एकप्रकारे हा न्यायात विघ्न आणण्याचा प्रकार आहे. म्हणजेच हे तंत्रज्ञान न्यायदानाच्या

बाबतीमध्ये ही फोल ठरते आहे.

ज्ञानशास्त्रीय विचार हे समाजापासून फारकत घेतल्याप्रमाणे असतात. समाजातील इतर महत्त्वपूर्ण गोष्टीकडे त्यामुळे दुर्लक्ष होते. याबाबत भाष्य करताना निवेदक म्हणतो, – ''मग तो ज्ञानशाखेचा विचार करू लागे. जाणिवा म्हणजे काय ? कॉग्निझन्स म्हणजे काय ? भाषा अमर्याद पण विवक्षित आणि स्पष्ट कशी करता येईल ? मग अशा विचारातील एका उल्हासित क्षणी त्याला अचानक आठवण होऊन तो भानावर येत अस.'– गरिबी, जातपात, डिस्ट्रिब्यूशन ऑफ वेल्थ, ग्लोबलाइझेशन, फ्रॅग्मेंटेशन, धार्मिक असहिष्णुता, स्त्रियांची पिळवणूक...'' (पृ. क्र. २१)

याठिकाणी जर ज्ञानशाखेचा विचार करत राहिलो तर महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यामुळे दुर्लक्ष होते असे निरीक्षण साठे नोंदवतात. असे हे ज्ञानशाखेचा विचार करणारे बुद्धिमंताचे जग समाजापासून फारकत घेतलेलेच असते. म्हणून तर अच्युत आठवलेसारख्या अर्थशास्त्रज्ञाच्या व्याख्यानाला पदाधिकारी धरून फक्त नऊ लोक हजर असतात. अच्युत आठवले एखाद्या पुस्तकाबद्दल वा नाटकाबद्दल लिहितो तेव्हा ते पुस्तक वा नाटक बारा–तेरा किंवा पंधरा लोक पाहतात किंवा वाचतात याठिकाणी साठे आपल्या वाचन संस्कृतीवर उपहासात्मक पद्धतीने भाष्य करताना आपल्या ज्ञानशाखेबद्दलही प्रश्न उपस्थित करतात.

संगणक युगामध्ये संणकाचा कितीही जयजयकार होत असला तरी आपल्याला इथं तंत्रज्ञानाच्या तत्त्वज्ञानाचाच एकंदरीने विचार करावा लागेल असे अच्युत नमूद करतो. यासंदर्भात त्याचे विचार महत्त्वपूर्ण आहेत.

''बरोबर आहे. अगदी म्हणजे योग्यच आहे... संगणकशास्त्राने ज्ञानशास्त्रीयदृष्ट्या माणसाचे आयुष्यच बदलले आहे. म्हणजे मुळात काय होणार की त्यांना (मुलांना) इंग्रजी भाषा शिकावी लागणार. परत तीही संगणकावरची, म्हणजे सूरविहीन, छापील, आपला सांस्कृतिक इतिहास, मौखिक परंपरा वगैरे आपण अगदी क्षणासाठी बाजूला ठेवलं समजा,... तरी अगदी वैज्ञानिक दृष्टिकोनातूनसुद्धा बरीच गडबड होणारच. वैज्ञानिकदृष्ट्या, आपला एक कान शब्दांची आठवण ठेवणाऱ्या मेंदूच्या भागाशी जोडलेला असतो आणि आपला दुसरा कान सुरांची आठवण ठेवणाऱ्या मेंदूच्या भागाशी जोडलेला असतो. आता ही मंडळी सूरच ऐकणार नाहीत आणि एखाद्या गोष्टीची जाणीवच झाली नाही तर त्याचा पुर्नप्रत्यय येणार कसा ?'' (पृ. क्र. ३३)

अच्युतची स्मृती ज्यावेळेस जाते तेंव्हा मानसोपचारतज्ञांच्या ज्ञानशाखेतील फोलपणा आपल्या निदर्शनास येतो. अच्युतवरती उपचार करत असताना तो काहीच बोलत नाही. तो कोणालाच ओळखू शकत नाही तेव्हा मानसोपचार तज्ञ अच्युत आठवले यांना ट्रॅन्झिअन्ट ग्लोबल ॲम्नीशिया नावाचा अगदी कॉमन असा मनोविकाराचा प्रकार झाला होता असे निदान करतात ते निवेदकाला हास्यास्पद वाटते तो म्हणतो स्पेशालिस्ट आणि स्पेशलायझेशनची उथळ टिंगल करावी हा आमचा हेतू नाही. आम्हीही कशाचे तरी स्पेशालिस्ट आहोत आम्हाला फक्त दोन स्पेशलायझेशनमधला फरक स्पष्ट करायचा आहे. फरक स्पष्ट करताना तो सांगतो. ''प्रयोगशाळेतील कण्डिशन्समध्ये, सार्वत्रिक नियमांचा शोध घेणे हा मानसोपचार या शाखेचा विषय आहे. आपला उलटा आहे. नैसर्गिक वातावरणात एखाद्या विशिष्ट व्यक्तीचा इतिहास पाहून, एक नव्हे तर मिळतील तशी आणि मिळतील तितकी सत्य शोधून काढणे हा आपल्या स्पेशलायझेशनचा हेतू आहे.'' (पृ. क्र. ११८)

निवेदकाच्या या स्पेशलायझेशनमधून वेगळी सत्य समोर येतात म्हणून मानसोपचार तज्ञ अच्युतबाबत ट्रॅन्झिअन्ट ग्लोबल ॲम्नीझिया म्हणून जे निदान करतात ते चुकीचे ठरते. कारण स्मृती गेली असतानाही अच्युत तर्कशुद्ध विचार करू शकत होता. आपली स्मृती गेलेली आहे याची त्यास तीव्रतर जाणीव होती म्हणजे याठिकाणी ज्ञान–विज्ञानाचे अनुमानही फोल ठरते.

मकरंद साठे याठिकाणी संगणक, तत्त्वज्ञान, मानसोपचारतज्ज्ञ या ज्ञान–विज्ञान शाखांच्या संदर्भात एकांगीपणे भाष्य करत नाही तर त्यांचे मानवी जीवनातील योगदान मान्य करूनही व्यक्तीच्या प्रत्येक समस्येला पर्याय म्हणून आपणास ज्ञान–विज्ञान या शाखांकडे पाहता येणार नाही हे सूचित करतात.

### २.२.८. जातीयता

'अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीमध्ये मकरंद साठे जागतिकीकरण, संगणक, अमेरिका याविषयी भाष्य करत असताना विश्व हे एक खेडे बनत चालल्याचा प्रत्यय आपणास येतो. सर्वसामान्य व्यक्ती ही जागतिक घडामोडींचा केंद्रबिंदू बनलेली आहे. अशा या आधुनिकीकरणाच्या युगामध्येही जातीयता मात्र आपले अस्तित्व टिकवून राहिली आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये अनेक गोष्टींची उलथापालथ झाली. बऱ्याच गोष्टी आपण नव्याने स्वीकारल्या काही टाकाऊ गोष्टी सोडून दिल्या परंतु एकूणच आपल्या समाजव्यवस्थेला जातीयतेची जी कीड लागलेली आहे ती मात्र या युगातही टिकून आहे. नॉर्वे, स्वीडन यासारखी नावे खेड्यांना प्राप्त झाली तरी त्या गावात राहणाऱ्यांची जात

कोणती याची विचारपूस केली जाते.

सहदेव हा नॉर्वेतील बहुतेक लोकांप्रमाणे दलित असतो तो ग्रामीण भागातील सुशिक्षित दलित कार्यकर्ता असतो. आपल्या समाजामध्ये जे थोर पुरूष झाले त्यांची नावे आपल्या गावातील गल्ल्यांना द्यावीत हा त्यांचा हेूत असतो. परंतु ह्यांच्या समाजात एवढा मोठा व्यक्तीच असू शकत नाही असे ठरवून स्वीडनमधील लोक या प्रकरणामध्ये हस्तक्षेप करतात. म्हणजे या ठिकाणी उच्चवर्णियांचा दुसऱ्या समाजाकडे पाहण्याचा हीन दृष्टीकोन दिसून येतो. यासंदर्भात सहदेव म्हणतो,

''स्वीडनमधील लोक खोडी काढतायत. आमच्या गल्ल्यांना आम्ही आम्हांला हवी ती नावं देणारं.'' पण त्यांना नाही ना पटत आमच्यातही ज्याचं नाव रस्त्याला धावं अशी मोठी लोकं आहेत, हेसुद्धा ते मान्य करणार नाहीत.'' (पृ. क्र. १०४)

अशा या वादातून सहदेवला अडचणीत आणण्यासाठी त्यावर 'उच्चवर्णीय मुलीचा विनयभंग केला' असा आरोप करून अटक केली जाते. त्यातून दंगल भडकते इ. यामधून जातीयतेचा संघर्ष अधिकच चिघळला जातो. उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेदाभेद या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्येही चालू आहे हे लक्षात येते. जातीयता ही फक्त खेड्यातच राहिलेली नाही तर ती शहरामध्ये साक्षर लोकांमध्येही चालू आहे हे गाडगीळ आणि अच्युत यांच्याबद्दलच्या प्रसंगावरून लक्षात येते.

गाडगीळ आणि अच्युत दोघे बरोबर प्रवास करत असताना अच्युतचा हेवा गाडगीळला वाटतो तो मनातल्या मनात म्हणतो,

''बरे असते या भोसडीच्यांचे, कसली जबाबदारी नाही. लग्न नाही. ब्राह्मण घरात जन्म, विद्यापीठात नोकऱ्या, आमच्यासारखं जगा एकदा म्हणावं. कसलं सफरिंग म्हणून नाही, भडव्यांना ना गरिबी, ना कुटुंब, ना झोपडपट्टीत जन्म,'' (पृ. क्र. ४७)

गाडगीळचा हा उद्रेक सहज स्वाभाविक असला तरी जातीयता हेच त्याच्या उद्रेकाचे प्रमुख कारण असल्याचे आपल्या निदर्शनास येते.

साने व जोशी अच्युतकडे सल्ला घेण्यासाठी आलेली असतात. त्याचवेळी भगत आणि सोनसळे हे ग्रामीण भागातले दलित कार्यकर्तेही अच्युतला भेटण्यास आलेले असतात. ते चौघे एकमेकांना जातीच्या माध्यमातून ओळखत असल्याने त्यांच्यामध्ये जो वैचारिक भडका उडतो तोही

जातीशी निगडीत असाच आहे. याप्रसंगी सोनसळे ब्राह्मणाविरूध्दचा आपला राग व्यक्त करताना म्हणतो,

''कधीतरी इथल्या जातवातीविषयी लिहा. मग शिव्या घाला इतरांना.'' (पृ. क्र. ३३) हे सोनसळेचे सानेला उद्देशून केलेले विधान पुरातन भारतीय जातीव्यवस्थेचे निदर्शक आहे. या विज्ञान युगात ही जातीयता टिकून तर राहिलीच आहे उलट आपली पाळेमुळे या समाजव्यवस्थेत अधिक घट्ट रूतवू पहाते आहे.''

### २.२.९. नवा कालविचार

मकरंद साठे यांची ही कादंबरी नवा कालविचार मांडते. व्यक्तीला आठवत असतो तो काळ कोणता असतो. वर्तमान, भूत की भविष्य ? व्यक्तीला येणाऱ्या आठवणी कोणत्या काळातल्या असतात ? माणसाची स्मृती जाते म्हणजे नेमके काय होते ? स्मृतीमध्ये आठवते ते काय असते ? वर्तमानकाळात आपण जगत असताना त्याचा संबंध भूतकाळ व भविष्याशी कशाप्रकारे जोडलेला असतो. तशा प्रश्नांच्या चक्रव्यूहामध्ये अच्युत आठवले अडकला आहे. त्यातूनच काळाविषयीचे नवे भान ही कादंबरी आपल्याला आणून देते.

काळ हा व्यक्तीच्या जगण्यावरती अधिसत्ता गाजवत असतो. व्यक्तीचे अनेक प्रश्न या काळाशी निगडीत असतात. म्हणून तर साठे नवा कालविचार मांडतात. काळ व अवकाश यांच्या कोंडीमध्ये माणूस अडकल्यानंतर त्याचीं जी घुसमट होते ती घुसमट या कादंबरीमधून क्षणोक्षणी प्रकट होते. अशा या काळाची गळचेपी स्वत: लेखकही करताना दिसतो. म्हणून निवेदक म्हणतो, ''आपण भाकीत करावे आणि ते खरे निघावे, असे एकदा होऊ लागले की काळ नावाच्या वस्तुची आपल्याला चांगली गळचेपी करता येते.'' (पृ. क्र. १)

काळाच्या संदर्भात निवेदक म्हणतो, जागृतावस्था, स्वप्नावस्था आणि तुर्यावस्था या तीन पातळ्या एकात एक गेल्या आणि त्यांच्यावरचा आपला ताबा सुटला की, काळ असा दाबला जातो मग स्पष्टीकरणे वाढत जातात. मुद्यांचे एकमेकांशी आडवेतिडवे संबंध वाढत जातात; 'क्रॉस कनेक्शन वाढत जाते; वाक्यांची लांबी वाढत जाते; या ठिकाणी काळाची गळचेपी आपण ज्या पद्धतीने करू पाहतो त्या पद्धतीमध्ये या तिन्ही अवस्था वेगवेगळ्या ठेवणे आवश्यक असते. त्यांच्यामध्ये गुंतागुंत निर्माण झाली तर काळाबद्दल संभ्रमावस्था वाढत जाते.

स्मृती काय असते ? याबद्दल विचार करताना अच्युत म्हणतो, 'स्मृती म्हणजे केवळ

भूतकाळाची पुनर्रचना नसते. 'तेव्हा'चे आता होते,' 'तेव्हा'तील चित्रे 'आंतातील चित्रांना स्पष्ट करीत असतात. एक सुसंगत चित्र तयार करत असतात.'' (पृ. क्र. १८)

अच्युत जागृतावस्थेत विचार करत असताना जास्त गोंधळत नाही; परंतु तो मनातल्या मनात विचार करताना स्मृतीच्या बाबतीत गोंधळून जातो. यासंदर्भात निवेदक म्हणतो, ''त्याच्या वाक्यातील पहिला भाग एका कालखंडातील स्मृतीशी निगडीत असे तर दुसरा भाग दुसऱ्या कालखंडातल्या स्मृतीशी. 'स्मृती म्हणजे काय सर्वच स्मृती. स्मृती अखंड नसली तर विचार कसा होणार. एखादी तर्कमालिका उलघडत जात असताना पुढील विधान आधीच्या विधानाशी जोडावे लागते. त्यासाठी आधीच्या विधानाची स्मृती लागतेच. आता हा झाला काळाचा भाग. अवकाशांच्या बाबतीतही हाच प्रश्न पडतो. त्याच्या विधानाचा पहिला अर्धा भाग एका अवकाशाशी निगडीत असे तर उरलेला दुसरा'' (पृ. क्र. २७)

अशा पद्धतीने अच्युतचे हे मानसिक पातळीवरचे विचार काळ, अवकाश, स्मृती या सर्वांचीच पुर्नमांडणी करताना दिसतात. त्यासंदर्भातील विचार जाणीवपूर्वक मांडून आपल्याला पुनर्विचार करायला भाग पाडतात. या संकल्पनाबद्दलच ते एक मोठे प्रश्नचिन्ह उभे करतात. आणि त्या प्रश्नाच्या खोल गर्तेमध्ये वाचकांना सोडतात.

दोन काळ एकमेकांत सरमिसळ होऊ लागतात. तेव्हा काळाबद्दल अधिकच गोंधळ वाढायला लागतो. अच्युतची स्मृती जाते ती स्मृती परत आल्यावर अच्युत स्मृती गेली त्या कालखंडातल्या घटनेबद्दल आठवायला लागतो. तेव्हा त्याला जे आठवते ते वेगळेच असते.

''अच्युतला आता या घटनाही आठवायला लागल्या. महात्मा नसलेले गांधी त्यांच्या डोळ्यासमोर यायला लागले. आपण कोपऱ्यात बसून आजारी बहिणीकडे पाहतो; मांडवात एका हातात लाडू धरून आपल्या आई–वडिलांचे लग्न पाहतोय, हे सगळं त्याच्या डोळ्यासमोर उभं राहायला लागलं. त्यानं परत परत डोकं झटकलं पण त्या आणि तशाच अनेक आठवणी जाईनात. डोकं हवं तेवढं स्वच्छ होईना. हळूहळू त्याचा काळाबद्दल गोंधळ वाढायला लागला. दोन काळ एकमेकांत सरमिसळ होऊ लागले. (पृ. क्र. १३१)

मकरंद साठे त्यांच्या लेखनाबद्दल शांता गोखले यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. त्या म्हणतात, ''कादंबऱ्यातून आणि नाटकातून मकरंद तुम्हा–तुम्हाला पडणारे अनेक प्रश्न उपस्थित करतो. हे प्रश्न समकालीन वास्तवातून उठले आहेत, परंतु त्याच्या संबंध थेट तुमच्या जगण्याशी आहे.

काळ इतका वेगाने बदलतो आहे, की या वास्तवाचं तत्कालीन आकलन पुरेसं अर्थपूर्ण होणं आणि त्यातून जगण्याला आधार मिळणं म्हणजे एकूण कठीणचं. परंतु मकरंद साठे भिडतो या प्रश्नांना त्याच्या परीने, आणि करतो एक मांडणी, पुष्कळदा ती अवघड असते किंवा दुर्बोध वाटते... वाचकांच्या डोक्यावरून जाते की काय!''[१]

शांता गोखले यांचे हे विचार साठे यांच्या लेखनाचे मर्म सांगतात. वाचकांसाठी दुर्बोध वाटणारे हे लिखान असले तरी साठे त्या प्रश्नांना भिडतात हे महत्त्वाचे आहे. एकंदरीत नवा कालविचार ते मांडतात.

## २.३ समारोप

'अच्युत आठवले आणि आठवण' ही मकरंद साठे यांची कादंबरी माणसा-माणसामधील अलगतेची भावना, त्यांच्या जगण्यातला अंतर्विरोध या पातळीवरून एक विराट कथ्य मांडण्याचा प्रयत्न करते. संपर्क साधन ही समस्या ह्या कादंबरीच्या बहुपेडी आशयाचाच एक भाग आहे. अच्युत आठवले आणि आठवण ही हरेकदृष्टीने वेगळ्या मार्गाने जाणारी कादंबरी आहे, ती आजच्या जीवनातल्या असंगतेविषयी असली तरी ती आपल्याला निरूत्साही करत नाही. उलट ती वाचून मनाला चक्क तरतरी येते.

अच्युत आठवले या विद्वान प्राध्यापकांच्या संभ्रमावस्थेचा, त्यांच्या एकाकीपणाचा, गोंधळलेपणाचा प्रवास या कादंबरीमध्ये येतो. आजच्या सर्वसामान्य विचारवंत मंडळींचा प्रतिनिधी म्हणून कादंबरीमध्ये अच्युत आठवले हे पात्र मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणून आपल्यासमोर उभे राहते. रूढ नायक किंवा प्रतिनायक यांच्या साचेबंद चौकटीमध्ये या अच्युत आठवलेला बसवता येत नाही कारण अच्युत आठवले हा समाजातील वास्तव नायकाचे रूप म्हणून कादंबरीमध्ये येतो. जून्या पारंपरिक तंत्राला स्वीकारत त्यात योग्य तो बदल घडवत मकरंद साठे आपल्या कादंबरीचा आकृतीबंध निर्माण करतात.

# संदर्भ सूची


१. डहाके, वसंत आबाजी – 'मकरंद साठे यांच्या कादंबऱ्या' 'प्रिय रसिक', पॉप्युलर प्रकाशन. डिसेंबर २००७, (पृ. क्र. ९)

२. देशपांडे, गो. पु. – 'नागरी जीवनाच्या निरर्थकत्वाची कहाणी' लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १७ ऑगस्ट २००३, (पृ. क्र. ४)

३. वडेर, प्रल्हाद – 'महानगरीय आयुष्याची शोकांतिका, साप्ताहिक सकाळ, १६ ऑगस्ट २००३, (पृ. क्र. २१)

४. सावंत, वासुदेव – 'उदाहरणार्थ कोसला', श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती – जून १९८८, (पृ. क्र. ३०)

५. नेमाडे, भालचंद्र – 'टीकास्वयंवर', औरंगाबाद, साकेत प्रकाशन. प्रथम आवृत्ती. सप्टेंबर १९९०, (पृ. क्र. २७६)

६. साठे, मकरंद – 'सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण' मुंबई, लोकवाङ्.मय गृह. पहिली आवृत्ती २००३, (I) पृ. क्र. ४७)

७. तत्रैव (पृष्ठ क्र. ५०)

८. तत्रैव (पृष्ठ क्र. ५१)

९. गोखले, शांता – 'साठेचं काय करायचं ?' साप्ताहिक सकाळ, दिवाळी २००५, (पृ. क्र . २३०)